**ठळक बातम्या**

- मुंबई आणि नागपूर महानगरपालिकेसाठी काँग्रेसचा, तर ठाणे महानगरपालिकेसाठी भाजपाचा जाहीरनामा प्रसिद्ध

- विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर यांच्या सांगण्यावरून उमेदवारी अर्ज स्वीकारले नसल्याचा दावा करत ८ जणांची मुंबई उच्च न्यायालयात धाव

- शेकडो नागरिकांची २०० कोटी रुपयांपेक्षा जास्तीची फसवणूक करणाऱ्या टोळीतल्या ७ जणांना अटक

- मुंबई सराफा बाजारात चांदीचा भाव प्रतिकिलो अडीच लाख रुपयांच्या वर

**आणि**

- माजी केंद्रीय मंत्री सुरेश कलमाडी यांच्या पार्थिवावर पुण्यात अंत्यसंस्कार

**<><><><><>**

मुंबई महानगरपालिका निवडणुकीसाठी काँग्रेसनं आज ‘मिशन मुंबई’ हा जाहीरनामा प्रसिद्ध केला. यात मुंबई महानगरपालिकेच्या बंद पडलेल्या मराठी शाळा सुरू करणं, शाळांमध्ये योग्य व्यवस्था उपलब्ध करणं, बेस्ट बसेस वाढवणं, मुंबईकरांना चांगली आरोग्य व्यवस्था, स्वच्छ पाणी आणि हवा देणं यासारख्या मुद्द्यांचा समावेश आहे. मिशन मुंबई ही केवळ निवडणुकीची घोषणा नसून मुंबईकरांच्या दैनंदिन जीवनाशी निगडित प्रश्नांना केंद्रस्थानी ठेवून शहराचा सर्वांगीण विकास घडवण्याचा निर्धार आहे. पाणी, आरोग्य, शिक्षण, वाहतूक, स्वच्छता, पर्यावरण, सार्वजनिक सेवा आणि सुरक्षितता या प्रत्येक मुद्द्यावर, लोकांच्या गरजांवर आधारित, पारदर्शक आणि जबाबदार प्रशासन देणं हे आमचं उद्दिष्ट आहे, असं प्रतिपादन मुंबई काँग्रेसच्या अध्यक्ष वर्षा गायकवाड यांनी केलं.

***होल्ड बाइट- वर्षा गायकवाड ( ३४ सेकंद)***

वंचित बहुजन आघाडी, रिपब्लिकन पक्षाचा गवई गट, राष्ट्रीय समाज पक्ष यांच्यासोबत काँग्रेस ही निवडणूक लढवत आहे.

नागपूर महापालिकेसाठीचाही काँग्रेसचा जाहीरनामा आज प्रसिद्ध झाला. नागरिकांना दर्जेदार आणि प्रभावी मूलभूत नागरी सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी काँग्रेसनं २० सूत्रांचा जनहितकारी आराखडा सादर केला. त्यात स्वच्छ, सुरक्षित आणि स्मार्ट नागपूर घडवण्याचा ठाम संकल्प व्यक्त करण्यात आला आहे, अशी माहिती प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी दिली.

**<><><><>**

भाजपानं ठाणे महानगरपालिका निवडणुकीसाठीचा ‘ठाणे निर्धारनामा’ हा जाहीरनामा आज प्रसिद्ध केला. या महापालिका निवडणुकीत किमान १०० नगरसेवक निवडून आणण्याचा निर्धार भाजपानं केला आहे. ठाण्यासाठी स्वतंत्र धरण बांधणं, नागरिकांना २४ तास पाणी पुरवणं आणि जुन्या, गळणाऱ्या पाइपलाइनसाठी विशेष निधीचं आश्वासन यात असल्याचं आमदार संजय केळकर यांनी सांगितलं. ठाणे शहरातल्या १९७ किलोमीटर लांबीच्या रस्त्यांचं काँक्रिटीकरण करण्याचं आश्वासन यात आहे.

**<><><><>**

विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर यांच्या सांगण्यावरून निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांनी मुंबई महानगरपालिका निवडणुकीसाठी उमेदवारी अर्ज स्वीकारले नसल्याचा दावा करत ८ जणांनी मुंबई उच्च न्यायालयात धाव घेतली आहे. राज्य निवडणूक आयोग आणि निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांना उमेदवारी अर्ज स्वीकारण्याचे आदेश देण्याची मागणी त्यांनी याचिकेत केली आहे. मुंबईतल्या २२४ ते २२७ क्रमांकाच्या प्रभागातून याचिकाकर्ते अर्ज भरण्यासाठी इच्छुक होते. नार्वेकर यांचे बंधू मकरंद नार्वेकर, वहिनी हर्षिता नार्वेकर आणि बहीण गौरी शिवलकर या प्रभागातून निवडणूक लढवत आहेत.

<><><><>

राज्यातल्या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका ७-८ वर्षांनंतर होत असूनही मोठ्या प्रमाणावर बिनविरोध उमेदवार निवडून येणं म्हणजे मतदारांचा अधिकार हिरावून घेणं आहे, अशी टीका राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाच्या कार्याध्यक्ष सुप्रिया सुळे यांनी केलं. यात धमक्या देणं, पैशांचा वापर, उमेदवारी अर्ज मागे घेण्यासाठी दबाव टाकणं, बोगस मतदान आणि मतदारांना दिली जाणारी प्रलोभनं सातत्यानं समोर येत असून निवडणूक आयोगाचं याकडे दुर्लक्ष होणं जास्त चिंताजनक आहे, असं सुळे म्हणाल्या.

<><><><>

लातूर इथं निवडणूक प्रचारादरम्यान माजी मुख्यमंत्री दिवंगत विलासराव देशमुख यांच्याबद्दल आपण केलेल्या वक्तव्याबद्दल भाजपाचे प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण यांनी आज माफी मागितली. हे वक्तव्य अराजकीय असल्याचं ते म्हणाले. रवींद्र चव्हाण यांच्या या वक्तव्यानंतर काँग्रेसनं त्यांच्यावर टीका केली होती.

<><><><>

एमआयएमचे नेते असदुद्दीन ओवैसी यांनी आज लातूरमधे महायुतीतल्या घटक पक्षांवर टीका केली. भाजपा, शिवसेना आणि राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते मुंबईत एकत्र बसतात, मात्र लातूर महानगरपालिका निवडणुकीत ते स्वतंत्रपणे लढवण्याचं नाटक करत आहेत, असा आरोप त्यांनी केला. या निवडणुकीत एआयएमआयएम उमेदवारांना लोकांकडून उत्तम प्रतिसाद मिळत आहे, असं ते म्हणाले.

<><><><>

ऑनलाइन परकीय चलन आणि सोन्याचा व्यवहार करणाऱ्या योजनांमध्ये शेकडो लोकांची २०० कोटी रुपयांपेक्षा जास्त रकमेची फसवणूक करणाऱ्या एका मोठ्या आंतरराष्ट्रीय टोळीचा पर्दाफाश पोलिसांनी केला आहे. विविध राज्यांमधल्या ५० पेक्षा जास्त प्रकरणांशी संबंधित ७ जणांना अटक केल्याची माहिती मीरा भाईंदर-

वसई विरारचे पोलिस आयुक्त निकेत कौशिक यांनी आज वार्ताहर परिषदेत दिली. फसवणूक करणाऱ्यांनी विवाह जुळवणाऱ्या वेबसाइट्स आणि सोशल मीडिया प्लॅटफॉर्मद्वारे विश्वास निर्माण करून पीडितांना फसव्या योजनांमध्ये गुंतवणूक करायला प्रवृत्त केल्याचं त्यांनी सांगितलं. या टोळीचे सूत्रधार देशाबाहेरून हा कारभार चालवत असल्याचा पोलिसांना संशय आहे.

**<><><><><>**

अग्निवीरांना शासकीय, निमशासकीय किंवा खासगी क्षेत्रात संधी मिळवून देणं किंवा स्वयंरोजगाराच्या संधी उपलब्ध करून देण्याच्या उपाययोजना सुचवण्यासाठी राज्य सरकारनं एक अभ्यासगट स्थापन केला आहे. सैनिक कल्याण विभागाचे संचालक निवृत्त कर्नल दीपक ठोंगे याचे अध्यक्ष असून उपसंचालक निवृत्त लेफ्टनंट कमांडर ओंकार कापले सदस्य सचिव आहेत. नौदल, हवाई दल आणि लष्करातल्या ७ निवृत्त वरिष्ठ अधिकाऱ्यांचा समावेश असलेल्या या अभ्यासगटाला उपाययोजना सुचवण्यासाठी ३ महिन्यांचा कालावधी सरकारनं दिला आहे.

**<><><><><>**

मुंबईतल्या २०२० पर्यंतच्या झोपड्यांना अधिकृत मान्यता देण्याची मागणी केंद्रीय राज्यमंत्री रामदास आठवले यांनी केली आहे. मुंबईतल्या मालाडमध्ये रिपब्लिकन पक्षाच्या उमेदवारांच्या प्रचारसभेत ते बोलत होते. पक्षाचे १२ उमेदवार मुंबई महापालिकेच्या रिंगणात आहेत. सध्या २०११ पर्यंतच्या झोपड्यांना अधिकृत मान्यता आहे.

**<><><><><>**

केंद्र सरकारने नुकत्याच सुरु केलेल्या जी राम जी योजनेबाबत साताऱ्याजवळच्या विलासपूर इथल्या ऋषीकेश मोरे यांनी सांगितलं.

***होल्ड... बाईट- २५ सेकंद***

**<><><><><>**

मुंबईच्या सराफा बाजारात चांदी आज ६ हजार रुपयांनी महाग होऊन किलोमागे अडीच लाख रुपयांच्या पलीकडे गेली. इंडियन बुलियन आणि ज्वेलरी असोसिएशनच्या दरांनुसार चांदी दिवसअखेर करांसह २ लाख ५० हजार ४४४ रुपयांच्या पलीकडे बंद झाली. गेल्या आठवड्यात चांदीनं अडीच लाखांच्या पातळीला स्पर्श केला होता, पण नंतर त्यात घसरण झाली होती. सोनं आज तोळ्यामागे सुमारे पाचशे रुपयांनी महागलं. २२ कॅरेट सोन्यासाठी १ लाख ३७ हजार रुपये तर २४ कॅरेट सोन्यासाठी १ लाख ४० हजार रुपये मोजावे लागत होते. रिलायन्स आणि एचडीएफसी बँकेच्या समभागात घसरण झाल्यानं आज सलग दुसऱ्या दिवशी शेअर बाजारात घसरण झाली. त्यामुळं सेन्सेक्स ३७६ अंकांनी घसरुन ८५ हजार ६३ तर निफ्टी ७२ अंकांनी घसरुन २६ हजार १७९ अंकांवर बंद झाला.

**<><><><><>**

माजी केंद्रीय मंत्री आणि पुण्याचे खासदार सुरेश कलमाडी यांच्या पार्थिवावर आज पुण्यातल्या वैकुंठ स्मशानभूमीत अंत्यसंस्कार करण्यात आले. काँग्रेस पक्षाचे नेते, पदाधिकारी, कार्यकर्ते आणि इतर यावेळी उपस्थित होते. कलमाडी यांचं आज पहाटे वयाच्या ८२व्या वर्षी प्रदीर्घ आजारानं पुण्यात निधन झालं. कलमाडी हाऊस या त्यांच्या निवासस्थानी त्यांचं पार्थिव अंत्यदर्शनासाठी ठेवण्यात आलं होतं. उपमुख्यमंत्री अजित पवार, केंद्रीय राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ, राज्याचे मंत्री चंद्रकांत पाटील यांनी कलमाडी यांचं अंत्यदर्शन घेतलं. पुणे शहराच्या सांस्कृतिक आणि क्रीडा क्षेत्राला नवी दिशा देण्यात कलमाडी यांचा मोलाचा वाटा होता. पुणे फेस्टिव्हल आणि पुणे आंतरराष्ट्रीय मॅरेथॉनसारख्या उपक्रमांची सुरुवात करून त्यांनी पुण्याला राष्ट्रीय स्तरावर वेगळी ओळख मिळवून दिली.

**//<><><><><>//**